पुण्यनगरी दि. 05/05/2023

# देगलूरमध्ये दोन अट्टल चोरट्यांकडून १० मोटारसायकली जप्त



# देगलूर पोलिसांची कामगिरी

**देगलूर/प्रतिनिधी**

देगलूर पोलिसांनी दोन अट्टल मोटारसायकल चोरांना अत्यंत शिताफीने अटक करुन त्यांच्याकडून १० मोटारसायकली जप्त केल्या आहेत.

देगलूर शहर व परिसरात मोटारसायकल चोरीच्या घटनांत वाढ झाल्याने चोरट्यांनी पोलिसांनी समोर आव्हान उभे केले होते. पोलिस निरीक्षक सोहम माछरे यांनी मोटारसायकल चोरांना शोधण्यासाठी पथक तयार केले. या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मुखेड तालुक्यातील भगनुरवाडी येथील माधव पांचाळ, उमेश इंगळे या दोघांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली. चोरट्यांनी १० मोटारसायकली चोरल्याची कबुली देत चोरीच्या मोटारसायकली पोलिसांच्या ताब्यात दिल्या. या चोरट्यांकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी देगलूर पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक केले आहे.